### रत्नागिरी जिल्हा व मातृसंस्थेतर्फे ॲड. आशिष शेलार यांना निवेदन सादर

# नमन कलावंतांसाठी सांस्कृतिकमंत्र्यांना साकडे

**कोकणात विशेषकरून रत्नागिरी जिल्ह्यात शिमगोत्सवाच्या काळात सादर होणारी 'नमन' कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नसून ती कोकणच्या लोकसंस्कृतीचा मुख्य गाभा आहे. 'नमन लोककला रत्नागिरी जिल्हा' या नोंदणीकृत मातृसंस्थेअंतर्गत सद्यस्थितीत तब्बल २१,००० हून अधिक कलाकार एकत्र आले आहेत. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि उत्थानासाठी शासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे असल्याची मागणी राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.**

रत्नागिरी : नमन लोककलावंतांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार व पालकमंत्री उदय सामंत यांना निवेदन देताना नमन संस्थेचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर (पीटी) कांबळे, उपाध्यक्ष मोहन घडशी. सोबत अन्य पदाधिकारी.

**त. भा. प्रतिनिधी**

**रत्नागिरी :** कोकणच्या मातीतील अत्यंत प्राचीन, समृद्ध आणि लोकाश्रय लाभलेल्या 'नमन' लोककलेचे जतन करणाऱ्या कलाकारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी 'नमन लोककला रत्नागिरी जिल्हा' या मातृसंस्था आणि कोकण नमन कलामंच, रत्नागिरी यांनी मंत्री शेलार यांच्यासमोर ही बुधवारी आयोजित कृतज्ञता सोहळ्याप्रसंगी कैफियत मांडली आहे. या लोककलेच्या व कलावंतांच्या ६ अत्यंत महत्वाच्या मागण्या तातडीने मंजूर करण्याची आग्रही मागणी करण्यात आली असल्याचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर (पीटी) कांबळे यांनी सांगितले.

सांस्कृतिक मंत्र्यांना या विषयी निवेदन देतेवेळी नमन लोककला रत्नागिरी जिल्हा कार्यकारिणीचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्यासह उपाध्यक्ष मोहन घडशी, यांच्यासह प्रमुख पदाधिकारी रवींद्र कोटकर, चंद्रशेखर पांचाळ, भिकाजी भुवड, श्रीधर खापरे, परशुराम मासये, गजानन तटकरे, अरुण कळंबटे, पांडुरंग होरंबे, यांच्यासह कार्यकारिणी सदस्य: विश्वनाथ गावडे, विलास भातडे, सुरेश येजरे, सुनिल गांगरकर, शिवाजी मासये, तानाजी दोरखडे, चंद्रकांत पालकर, मुकुंद बावकर, हरिश्चंद्र बंडबे, तानाजी गुडेकर, संजय भागडे, संजय बुरटे, संजय पेजले, सुरेश होरंबे, विठ्ठल साळवी, प्रमोद होरंबे, रामाराम भोवड, श्रीकांत बोंबले, रविंद्र कोटकर, भिकाजी भुवड, संतोष बळकटे, कृष्णा जोगले, सचिन काष्टे, मनोज घवाळी, महादेव कळंबटे, सचिन तांबे, अमित डांगे, प्रविण कळंबटे, संतोष धनावडे, संजय गावडे, सुरेश दसम, सुनील लोगडे, दिनेश शितप यांच्यासह रत्नागिरी जिल्हा व मातृसंस्थेतील अनेक मान्यवर कलावंत उपस्थित होते.

## सहवेदना

### लक्ष्मी शेलार

**खेड :** तालुक्यातील घोगरे-जाखणवाडी येथील रहिवासी व सध्या कुर्ला-मुंबई येथे वास्तव्यास असलेल्या लक्ष्मी दाजी शेलार (८०) यांचे १८ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

### रामचंद्र पालांडे

**खेड :** तालुक्यातील तळवटपाल येथील रहिवासी व सध्या पुणे येथे वास्तव्यास असलेल्या रामचंद्र श्रीपत पालांडे (९१) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुलगे, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### सुंदरा पाटील

**लांजा :** तालुक्यातील माचाळ गावचे रहिवासी, सामाजिक कार्यात पुढे असणारे आणि नेहमी माचाळ गावाच्या हिताचा निर्णय घेणारे माचाळ गावचे गावकर अशोक पाटील यांच्या आई सुंदरा पांडुरंग पाटील (६५) यांचे १७ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यामुळे त्यांच्या निधनाने माचाळ गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात तीन मुलगे, मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# पाचलमध्ये जुगार अड्ड्यावर कारवाई

**त. भा. प्रतिनिधी**

**राजापूर :** तालुक्यातील पाचल हनुमाननगर परिसरात कल्याण मटका जुगार खेळणाऱ्या एका इसमावर राजापूर पोलीस ठाण्यांतर्गत असलेल्या रायपाटण पोलीस दुरक्षेत्राच्या पथकाने कारवाई केली आहे.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल स्वप्निल प्रताप घाटगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून नंदकुमार देवीदास खानविलकर (४८, रा. पाचल, पेठवाडी) याच्यावर महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार १६ जुलै रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास पाचल येथील हनुमान मंदिराच्या मागील बाजूच्या रस्त्यावर आरोपी नंदकुमार खानविलकर हा बेकायदेशीररित्या मटका जुगार खेळत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. रायपाटण दुरक्षेत्राच्या पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन आरोपीला ताब्यात घेतले.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून कल्याण मटका जुगाराचे साहित्य आणि रोख रक्कम असा एकूण १२५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी राजापूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

## अज्ञात वाहनाच्या धडकेने भेकराचा मृत्यू

**खेड :** मुंबई-गोवा महामार्गावरील महाड हद्दीतील वहूरनजीक जंगलातून अन्नाच्या शोधार्थ फिरणाऱ्या दीड वर्षीय भेकराचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. एका महिन्यात दुसऱ्यांदा भेकराचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली.

अन्नाच्या शोधात भटकणाऱ्या दीड वर्षीय भेकराला गावाजवळील कुत्र्यांनी घेरले. त्यातून सुटका करण्यासाठी भेकर सैरावैरा पळू लागले. याचदरम्यान महामार्ग ओलांडत असताना मुंबईकडून महाडकडे येणाऱ्या अज्ञात वाहनाच्या धडकेत भेकराचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच महाड वनपरिक्षेत्र अधिकारी आशिष पाटील, दासगाव वनपाल सचिन मेने, वनरक्षक नरे, थळकर आदींनी घटनास्थळी धाव घेत भेकराला ताब्यात घेतले. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून शवविच्छेदन केल्यानंतर मृत भेकराची विल्हेवाट लावण्यात आली.

## सामाजिक कार्यकर्ते सुरेश शिंदे यांचे निधन

**त. भा. प्रतिनिधी**

**रत्नागिरी :** येथसामाजिक कार्यकर्ते सुरेश उर्फ पोपट शिंदे (६६) यांचे १६ जुलै रोजी एका खासगी रुग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले. रत्नागिरीतील जुने रिक्षाचालक म्हणून ते परिचित होते. आरोग्यदूत म्हणून ते ४० वर्षांहून अधिक काळ ते नि:स्वार्थ कार्य करत होते. धनगर समाजासाठी प्रचंड योगदान दिले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे.

# आंबेत पूल अपघात प्रकरणी बार्जेस मालकाविरोधात गुन्हा

**त. भा. प्रतिनिधी**

**मंडणगड :** म्हाप्रळ-आंबेत पुलास ६ जुलै रोजी पहाटे बार्जेसनी धडक दिल्याप्रकरणी बार्ज मालक रशाद अहमद मुजावर ( बांद्रा प.) याच्या विरोधात मंडणगड पोलीस ठाण्यात शुक्रवारी रात्री गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पूरस्थितीचा इशारा देऊनही निष्काळजीपणाचा ठपका त्याच्यावर ठेवण्यात आला आहे.

याबाबत रायगड जिल्ह्यातील माणगाव येथील सार्वजनिक बांधकामचे कनिष्ठ अभियंता ओंकार शिरगांवकर यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली होती. त्यानुसार, ६ जुलै रोजी रत्नागिरी व रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला होता.

सावित्री नदीला पूर येण्याची शक्यता असूनही बार्ज मालक रशाद मुजावर यांनी बार्ज सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक खबरदारी घेतली नाही.

बार्ज बांधण्यासाठी वापरलेल्या दोरखंड व नांगरांची योग्य देखभालही केली नाही. या निष्काळजीपणामुळे महाड तालुक्यातील सापे येथे नांगरून ठेवलेल्या तीन बार्ज पुलाच्या प्रवाहात वाहून गेल्या. त्यापैकी दोन या बार्ज पहाटे सुमारे ४.३० वाजता म्हाप्रळ-आंबेत पुलाला धडकून अडकल्या.

त्यामुळे पुलाचे नुकसान झाले. पुलावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याने संबंधित बार्ज मालकाच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



- पूरस्थितीचा इशारा देऊनही निष्काळजीपणाचा ठपका

## राजापुरात २३ जुलै रोजी रक्तदान शिबीर

**राजापूर :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजप राजापुरच्यावतीने २३ जुलै रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता राजापूर येथील ग्रामीण रुग्णालयात हे शिबीर आयोजीत केले आहे.

रक्तदान हे सर्वोत्तम सामाजिक दान मानले जाते. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि समाजात रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उपसभापती अभिजित गुरव, मोहन घुमे यांनी सर्वांनी या सामाजिक उपक्रमात रक्तदात्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

CNR NO. MHRT050005012026 अर्जदार तर्फे वकील श्रीम. ए. जी. राउत

**जाहीर नोटीस**

**खेड येथिल मे. सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर (श्री. डी. जी. म्हस्के ) यांचे न्यायालयात मुक्काम खेड, ता. खेड, जि. रत्नागिरी**

नेमली तारीख २४/०८/२०२६ दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२७/२०२६
वारस सर्टिफिकेटाबद्दल जाहीर नोटीस निशाण क्र. ७
इस्माईल जैनुदिन परकार व ४ .....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही .....सामनेवाला
प्रति,

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार इस्माईल जैनुदिन परकार व. ४ रा. आमशेत, मु.पो. फुरुस, ता. खेड, जि. रत्नागिरी यांनी खेड येथील मे. दिवाणी न्यायालयात वारस दाखला मिळण्यासाठी दि. कि. अर्ज क्र. २७/२०२६ दाखल केला आहे. अर्जदार क्र.१ यांची पत्नी व क्र. २ व क्र.३, क्र.४ यांची आई श्रीम. हालिमा इस्माईल परकार हया फुरुस, ता. खेड, जि. रत्नागिरी येथील कायमचे रहिवाशी होत्या. त्या दि. ०५/०५/२०२६ रोजी परकार हॉस्पिटल रत्नागिरी येथे मयत झाल्या आहेत. श्रीम.हालिमा इस्माईल परकार यांचे मृत्यू पश्चात त्यांच्या मिळकतींना कागदोपत्री फेरफार कामी व इतर शासकिय तसेच कायदेशीर कार्यवाही करणेकरीता तसेच अन्य ठिकाणी अर्जदार क्र.१ ते ४ यांना वारस दाखला आवश्यक असलेने वारस दाखला मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्र. १ इस्माईल जैनुदिन परकार हे पती तर अर्जदार क्र. २ हीना इस्माईल परकार, अर्जदार क्र. ३ हाशीमा रिदवान परकार, अर्जदार क्र. ४ असद इस्माईल परकार ही मुले असून यांचे व्यतिरिक्त श्रीम. हालिमा इस्माईल परकार अन्य कोणीही वारस नाहीत.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ ते ४ यांस तसा वारस दाखला मिळणेस कोणाची हरकत असल्यास त्यांनी वरील मे. कोर्टात दि. २४/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वत: अथवा प्रतिनिधी मार्फत हजर राहून आपले म्हणणे दाखल करावे. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांस तसा दाखला मिळणेस कोणाचीही हरकत नसल्याचे मानून चौकशीचे काम पुर्ण करण्यात येवून अर्जदार क्र. १ ते ४ यांना तसा वारस दाखला देणेबाबत पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४ जुलै २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

तयार करणार

(एस.डी. पवार) क. लिपिक — दिवाणी न्यायालय, क. स्तर, खेड
कोर्टाचा शिक्का
(आर. बी. नितोरे) सहा. अधिक्षक (आस्था) — दिवाणी न्यायालय, क. स्तर, खेड, जि. रत्नागिरी

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,

परिशिष्ठातील नमुद मिळकत ही भरत प्रबोधचंद्र भटपाठक यांचे मालकीची असून सदर मिळकत जमिन मालक भरत प्रबोधचंद्र भटपाठक यांनी सर्व हक्कासह आमचे अशिल रविकिरण हणमंत जाधव पाटील यांना कायमस्वरुपी विकत देण्याचे ठरविले आहे व तसे प्राथमिक बोलणे झाले आहे. सदर मिळकतीमधील जमिन मालक यांची मालकी व त्यांचे क्षेत्र हे पूर्णपणे निर्वेध व जोखिमविरहीत असल्याची जमिन विक्री करण्यास कोणाचीही आडकाठी नसल्याची, तसेच सदर मिळकतीवर कोणाचा बोजा व हक्कसंबंध, वारसा हक्क, मालकी हक्क इत्यादी नसल्याची खात्री व भरवसा व हमी त्यांनी आमचे अशिलांना दिली आहे.

तरी देखील सदर मिळकतीवर अगर त्या विरुध्द कोणाही व्यक्तीचा अथवा संस्थेचा अथवा कंपनीचा वारसा, गहाण, विक्री, विक्रीचा करार, इनाम, भाडेपट्टा, तारण, अथवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणताही कायदेशीर बोजा अथवा हक्क, हितसंबंध असेल, त्यामुळे सदर व्यवहारास हरकत असेल तर अशा व्यक्तीनी अथवा संस्थांनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत खाली सही करणार यांचे दिलेल्या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत (१०.३० ते १७.३० वाजता) ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसांचे आत लेखी अथवा प्रत्यक्ष भेटून नोंदवाव्या अन्यथा कोणाचेही काही हक्क, हितसंबंध किंवा हरकती नाहीत अथवा असल्यास ते त्यांनी सोडुन दिल्या आहे असे समजण्यात येईल व आमचे अशिल सदरहू व्यवहार पूर्ण करतील. सदरच्या नमूद मुदतीनंतर कोणाचीही कसलीही तक्रार आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे परिशिष्ठ

मौजे सरफरेवाडी, ता. जि. रत्नागिरी येथील मिळकत

| गाव | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| सरफरेवाडी (नाणिज) | ४१२ | ०-८१-०० | ०.३४ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : १८/०७/२०२६
रत्नागिरी

**ॲड. प्रफुल्ल रामचंद्र साळवी**
शॉप नं. ४बी, कुणबी नागरी पतसंस्था बेसमेंट, सेंट्रल बँक जवळ, जावकर प्लाझा,जयस्तंभ, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी.
मोबा.नं. ९४२३२४५५९६

**महाराष्ट्र ग्रामीण बँक**
**MAHARASHTRA GRAMIN BANK**
शासकीय मालकीची शेड्युल्ड बँक Scheduled Bank Owned by Government

**ई-लिलाव व विक्री सूचना**

मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. ४२, गट क्र. ३३,(भाग), गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर -IV, सिडको, छ. संभाजीनगर .-४३११३६.
क्षेत्रीय कार्यालय : रत्नागिरी

**सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेटस एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा - २००२ तहत ई-ऑक्शन द्वारे (ऑनलाईन विक्री) विक्रीची जाहीर सूचना तथा, कर्जदार / जामीनदारास सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ (यापुढे नियम असे संबोधन्यात येईल) सह वाचण्यात येणारा सरफेसी कायदा २००२ (यापुढे कायदा असे संबोधण्यात येईल) तहत ई-ऑक्शन द्वारे विक्री**

खालील सही करणार प्राधिकृत अधिकारी यांनी परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचा सेक्युरीटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्सियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तहत प्रदान अधिकारांच्या अंमलबजावणीसाठी आणि खालील कर्जदार / तारणकर्ता यांचे संरक्षित मालमत्तेच्या घेतलेल्या ताब्याला अनुसरून व सर्व जनतेस व संबधीत कर्जदार / तारणकर्ता व जर त्यांचे कायदेशीर वारसदार असतील तर त्यांचेसह सर्व संबधीतास कळविण्यात येते की, खाली नमूद मालमत्तेच्या खरेदीसाठी बँकेकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. त्यामुळे, बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी उपरोक्त कायद्याचे नियम ८ व ९ नुसार खालील मालमत्ता **'जशी आहे जेथे आहे तशी'** व **'जी काय आहे तशी'** या तत्वावर ऑनलाईन जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँक हे संरक्षित ऋणको आहेत, त्यामुळे कर्जदाराचे /भागीदाराचे इतर कोणत्याही ऋणकोचे प्रलंबित वाद हे लिलावाद्वारे खरेदी केलेल्या मिळकतीमध्ये तसेच खरेदीदाराचे हक्क यास प्रभावित करू शकणार नाहीत. तसेच विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेवर कोणत्याही कोर्टाची स्थगिती (Stay) नाही.

| मिळकत लॉट क्र. | कर्जदाराचे / जामीनदाराचे नाव व पत्ता, शाखेचे नाव व कर्ज खाते क्र. | मालमत्तेचा तपशील (चतु:सीमेसहीत) | विक्री केली जात असलेल्या मालमत्तेची थकीत रक्कम | आरक्षित किंमत रुपये इसार जमा राशी रुपये बोली रक्कमेतील किमान वाढ रुपये | प्रत्यक्ष ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार- एम/एस. जयलक्ष्मी एंटरप्रायझेस १) श्री. उमेश सुरेश शिंदे (मालक)** पत्ता: फ्लॅट क्र. २०२, दुसऱ्या मजल्यावर, रवींद्रोदय प्लाझा, कान्हे हॉलजवळ, कळंबस्ते, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, पिन कोड : ४१५६०५. **२) श्री. अभिषेक प्रमोद दाभोलकर (जामीनदार)** पत्ता: फ्लॅट क्र. १०४, चंद्रसुमन सोसायटी, कान्हे हॉलजवळ, कळंबस्ते, ता.चिपळूण, जि.रत्नागिरी, पिन कोड :- ४१५६०५ **कर्ज खाते क्रमांक ६७१२६०००१९३/ ६७१२६००३३०९/६७१२६००१४८२** | श्री उमेश सुरेश शिंदे यांच्या फ्लॅट क्र. २०२, बांधकाम क्षेत्रफळ ७५५ चौ. फूट, दुसऱ्या मजल्यावरील 'रविंद्रोदय प्लाझा' मध्ये, गट क्र. १४९/१ मध्ये, क्षेत्रफळ ००-०८-५० (एच-आर), कळंबस्ते, तालुका चिपळूण, जिल्हा रत्नागिरी ४१५६०५ येथे स्थित. मोजमाप : बांधकाम क्षेत्रफळ ७५५ चौ. फूट चतु: सीमा खालीलप्रमाणे आहे: पूर्व: मार्ग पश्चिम: मोकळी जागा उत्तर: मोकळी जागा दक्षिण: फ्लॅट क्र. २०१ | एकूण थकबाकी . रु.२१,१६,८४४.१९ + दि. ३०-०६-२०२३ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०७/२०२३ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च | रु. १९,४०,०००/- / रु. १,९४,०००/- / रु. १०,०००/- | ११.०७.२०२५ |
| २ | **कर्जदार - मेसर्स समृद्धी प्रिंटर्स १) श्री. जितेंद्र चंद्रकांत परब (मालक)** पत्ता:मु/पो.सारंबळ-किर्तनवाडी,ता. कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पिन कोड:४१६५२० **२)सौ.सुस्मिता जितेंद्र परब(सह-कर्जदार)** पत्ता: मु/पो.सारंबळ-किर्तनवाडी,ता.कुडाळ,जि.सिंधुदुर्ग,पिनकोड: ४१६५२० .**३) श्री. हिरामणी रामचंद्र परब (जामीनदार)** पत्ता: मु/पो. वायंगवडे, चारिवाडी,ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग, पिन कोड:४१६६०३ **४) श्री. किशोर हिरामणी परब (जामीनदार)** पत्ता:मु/पो.वायंगवडे, चारिवाडी,ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग, पिन कोड: ४१६६०३ **५) श्री.शायर कासम खान (जामीनदार)** पत्ता: मु/पो. सारंबळ, दुर्गावाडी, सरसोली धाम जवळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग,पिन कोड: ४१६५२० **कर्ज खाते क्रमांक ६७२०१०००३४६ / ६७२०१००५५७२/६७२०१००५८४४** | श्री. जितेंद्र चंद्रकांत परब व सौ. सुस्मिता जितेंद्र परब यांच्या नावाने असलेला दुकान गाळ्याचा समतुल्य तारण बाजारपेठ, कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील गणेश कॉम्प्लेक्स मधील दुकान गाळा क्र.८, ग्रामपंचायत घर क्रमांक ६०२(८), क्षेत्रफळ ५१.६० चौ.फु.असलेली जागा तसेच त्यावर उभारलेली इमारत, शेड्स व इतर बांधकामासह सर्व मिळून असलेली मालमत्ता. मोजमाप : बांधकाम क्षेत्रफळ ५१.६० चौ. फूट चतु: सीमा खालीलप्रमाणे आहे पूर्व: इमारतीचा मार्ग पश्चिम: मोकळी जागा उत्तर: जिना दक्षिण: दुकान गाळा क्र. ०७ | एकूण थकबाकी. रु.२४,७५,७८२/- + दि. ३१-०३-२०१४ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०४/२०१४ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च | रु. ४,१८,०००/- / रु. ४१,८००/- / रु. १०,०००/- | १७.०३.२०२१ |
| ३ | **१) श्रीमती स्नेहा संजय घोसळकर (कर्जदार)** पत्ता: फ्लॅट क्र. T-५, आर्मोल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, बी. एन. सावंत रोड, मु.पो. व ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६१२ **२) श्री.सुमित संजय घोसळकर (सह-कर्जदार)** पत्ता: फ्लॅट क्र. T-५, आर्मोल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी, बी. एन. सावंत रोड, मु. पो. व ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६१२० **३) श्रीमती विजया सुधाकर सावंत** पत्ता: ५२, चौसोपी साड्यांमिरया, रत्नागिरी, ता. व जि. रत्नागिरी ४१५६१२ **४) श्री. नर्जुल इस्लाम हेकमत अली** पत्ता: १०८०, पाडवेकर कॉलनी, उद्यम नगर, रत्नागिरी, ता. व जि. रत्नागिरी ४१५६३९ **कर्ज खाते क्र.: ६७१०१००९६५९** | समभागीय गहाण : रत्नागिरी नगर परिषद हद्दीतील, मु. पो. व ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६१२ येथील राहतघर मधील इमारत 'आर्मोल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी', बी.एन. सावंत रोड येथील तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. T-०५, ज्याचे क्षेत्रफळ १६० चौ. फूट (सर्व्हे क्र. ६१-१-१, हिस्सा क्र. ८, क्षेत्र ०.१९) आणि क्षेत्रफळ ७३० चौ. फूट (सर्व्हे क्र. ६१-१-१, हिस्सा क्र. ९, क्षेत्र ०.९१) आहे. चतु:सीमा: पूर्व: फ्लॅट क्र. T-०६,पश्चिम: फ्लॅट क्र.T-०४, उत्तर: मोकळी जागा, दक्षिण: रस्ता/पॅसेज | रु. १४,०९,८८६.४२ + ३१/०५/२०२५ पर्यंतचे वसूल न झालेले व्याज + बिगर-लागू व्याज दिनांक ३०/०४/२०२५ पासून + इतर खर्च व आकार. | रु. २२,२०,०००/- / रु. २,२२०००/- / रु. १०,०००/- | १३.०२.२०२६ |
| ४ | **कर्जदार: १) श्री. भगवान लक्ष्मण सुतार** पत्ता: ३०७८ ए, झाडगाव नाका, भैरीवाहन जवळ, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी ४१५६१२ **जामीनदार: १) सौ संगीता भगवान सुतार** पत्ता: ३०७८ ए, झाडगाव नाका, भैरीवाहन जवळ, रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी ४१५६१२ **२) श्री. सतीश सदाशिव कुलकर्णी** पत्ता: ब्लॉक नंबर १, साईराज अपार्टमेंट पार्क ओपल, अभ्युदय नगर, नाचणे रोड, रत्नागिरी, ता. व जि. रत्नागिरी ४१५६१२. **कर्ज खाते क्र. ६७१०१०००५६६, ६७१०१०१०२४६** | समतुल्य गहाणखत मौजे नाचणे, तालुका व जिल्हा रत्नागिरी ४१५६१२ येथील सर्व्हे क्रमांक ४४१/अ, हिस्सा क्रमांक ७/१२, ग्रामपंचायत घर क्रमांक १५९०-फ मधील एकूण क्षेत्रफळ ०.०६.८० हे.आर. आणि ४०० चौरस फूट बिल्ट-अप क्षेत्रफळ असलेले, 'साईदीप गृहसंकुल' नावाच्या इमारतीमधील 'ए' विंगच्या पहिल्या मजल्यावरील निवासी फ्लॅट क्रमांक ए-१०१ चे सर्व तुकडे आणि भूखंड. गहाण मालमत्तेच्या चतु:सीमा: पूर्व: रस्ता,पश्चिम: हिस्सा क्रमांक ५ उत्तर: भूखंड क्रमांक १, दक्षिण: श्री. रसाळ यांची मालमत्ता | एकूण थकबाकी. रु. ८,७८,५५०.०४ + दि.२९-०१-२०२६ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०१/२०२६ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च | रु. ७,९२०००/- / रु. ७९२००/- / रु. १०,०००/- | २०.०६.२०२६ |
| ५ | **१) श्री. जयेश अनंत खानविलकर - कर्जदार: २) श्रीमती कोमल जयेश खानविलकर- सहकर्जदार:** फ्लॅट नंबर १०२, घर क्रमांक १३४०बी, ओमसाईराम लक्ष्मी कृपा, शांतीनगर, मु. पो. नाचणे, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६३९. **जामीनदार: १) श्री. दिलीप दयाराम देसाई** पत्ता: बी२, वेदांग पॅराडाईज, थिबा पॅलेस रोड, रत्नागिरी, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी ४१५६१२. **कर्ज खाते क्रमांक: ६७१०१००४०८३ ६७१०१०००६०१,६७१०१००६७५०** | समतुल्य गहाणखत मौजे शांती नगर, नाचणे, तालुका व जिल्हा रत्नागिरी ४१५६३९ येथील सर्व्हे क्रमांक ४४३, हिस्सा क्रमांक (१/२अ+१/२ब+१/२इ)२/७ वरील जमिनीवर बांधलेल्या ओम साईराम लक्ष्मी कृपा अपार्टमेंट नावाच्या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील ११७२ चौरस फूट क्षेत्रफळ असलेला निवासी फ्लॅट क्रमांक १०२, म्हणजेच ग्रामपंचायत घर क्रमांक १३४०बी चे सर्व तुकडे आणि भूखंड. सदर क्षेत्राच्या चतु:सीमा : पूर्व: खुली जागा आणि रस्ता, पश्चिम: फ्लॅट क्रमांक १०१, उत्तर: बाजार समितीची मालमत्ता दक्षिण: श्री. केतकर यांची मालमत्ता | एकूण थकबाकी. रु. १७,९७,७१३.३४ + दि.२७-०६-२०२५ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. ०१/०६/२०२५ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च | रु. २५,३२,०००/- / रु. २,५३,२००/- / रु. १०,०००/- | २०.०६.२०२६ |
| ६ | **कर्जदार: १)श्रीम. दिक्षा हनुमंत लाड** पत्ता:मु. पो. गोठणे ता. मालवण जि. सिंधुदुर्ग **जामीनदार: २) श्री. शैलेश रामचंद्र चव्हाण** पत्ता- श्री समर्थ लिला इमारत, दुसरा मजला, सदनिका क्र.एस-१७, मु.पो. आशिये, ता.कणकवली जि. सिंधुदुर्ग. **कर्ज खाते क्रमांक: ६७२०३०००८०९ / ६७२०३००४६४४** | समतुल्य गहाणखत जामीनदार श्री. शैलेश रामचंद्र चव्हाण यांच्या मालकीची मालमत्ता. निवासी फ्लॅट क्रमांक एस-१७, दुसरा मजला, ज्याचे नाव श्री. समर्थ लीला आहे, जी.पी. मिलकत क्रमांक ३४९, बांधलेले क्षेत्रफळ ६४५.५५ चौ.फूट, जे आशिये, ता. कणकवली येथील गट क्रमांक २१०/१२ (एकूण क्षेत्रफळ ०-०३-३८ एच.आर) आणि गट क्रमांक २१०/१३ (एकूण क्षेत्रफळ ०-०४-०२ एच.आर) असलेल्या जमिनीवर उभे आहे. चतु:सीमा: पूर्व:- मोकळी जागा पश्चिम: निवासी सदनिका क्र. एस-०१६ उत्तर: मोकळी जागा दक्षिण: जिना | एकूण थकबाकी. रु.९,९५,६३७.३८ + दि.१२-११-२०२५ पर्यन्त चे अप्रयुक्त व्याज + दि. १३/११/२०२५ पासूनचे वसूल न केलेले व्याज + शुल्क + खर्च | रु. ११,७०,०००/- / रु. १,१७,०००/- / रु. १०,०००/- | १९.०६.२०२६ |
| ७ | **१) श्री. अनिल पांडुरंग कदम - कर्जदार २)सौ.अनुजा अनिल कदम-सहकर्जदार बावडेकर बंगला,** मु.पो.पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, पिन - ४१६ ११२. **३) श्री. दीपक राजाराम शिर्के - जामीनदार पत्ता :मु.** पो. काटलवाडी, ता. चिपळूण,जि.रत्नागिरी, पिन -४१६ ६२८.**४) श्री. शांताराम महादेव कोलगे - जामीनदार पत्ता :**मु.पो.ब्राम्हणवाडी, शिरगाव, ता. चिपळूण,जि. रत्नागिरी, पिन - ४१५ ६०४. **कर्ज खाते क्रमांक : ६७१२६००४७४४** | समतुल्य गहाणखत ता. गुहागर, जि. रत्नागिरी येथील मौजे शृंगारतळी येथील सर्व्हे क्र. २२ अ/१, उपविभाग क्र. १०, क्षेत्रफळ ०-२७-० (हे.आर.) या मिळकतीवर